## जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक १८ सप्टेंबर २०१८

## कार्यवृत्त भाग १

| दिनांक व वेळ | उपस्थित पदाधिकारी व अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|
| दिनांक १८.९.२०१८ वेळ दुपारी १.०० वा. | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक १८.९.२०१८ ला दु. १.०० वा. मा. श्रीमती सिमा मडावी, अध्यक्षा, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद सभागृह येथे आयोजित करण्यात आली. सभेला विषय समितीचे सन्मा. सभापती, सन्मा. सदस्य जिल्हा परिषद, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) तथा सचिव स्थायी समिती, जिल्हा परिषद व इतर खात्याचे विभाग प्रमुख, खंड विकास अधिकारी, उपविभागीय अभियंते व कर्मचारी उपस्थित होते.

**विषय क्रमांक १ :-** मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्याबाबत.

**ठराव क्रमांक १ :-** सभेच्या सुरवातीला सन्मा.सदस्य श्री.सुरेश हर्षे यांनी आज जिल्हा परिषदे मधील वर्ग ३ व ४ चे सर्वच कर्मचारी यांचे तिन दिवसाचे वेतन कपाती संबधाने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी काढलेल्या आदेशाबाबत असहकार आंदोलन सर्व संघटनेच्या माध्यमाने करण्यात येत आहे त्यामुळे आजच्या सभेत कार्यवृत्त लिहणारे कर्मचारी दिसुन येत नाही करीता आजची सभा तहकुब करुन पुढे आयोजित करण्याची मागणी करुन नाराजगी व्यक्त केली. यावर मा.सभाध्यक्ष महोदया यांनी आजच्या सभेत सर्वच विभागाचे खाते प्रमुख हजर असल्यामुळे सभेला आवश्यक माहिती मिळू शकेल तसेच सभेचा कोरम पुर्ण झालेला आहे करीता सभा सुरु ठेवण्यास हरकत नाही असे मत व्यक्त करुन सभा सुरु करण्याचे सुचित केले.

सन्मा. सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी सभेत उपस्थितांना चाहा,नास्ता व पाणी पुरविण्याकरीता विनंती केली. तसेच पुढील सभे पासुन संबंधित विभागाचे विभाग प्रमुख (खाते प्रमुख) यांनी सभेत उपस्थित मुद्याचे अनुषंगाने सोबत कार्यालयीन संबधित कर्मचारी यांनीही हजर राहण्याकरीता आपण आदेशीत करावेत असे मत व्यक्त केले जेणे करुन आवश्यक माहिती वेळेत सभेत उपलब्ध होईल व सभेचा वेळ वाया जाणार नाही अशी विनंती केली.

सन्मा. सदस्य श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी सभा सुरु ठेवण्याबाबत अनुमोदीत केले. सन्मा.सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी सभेचे असे निदर्शनास आणून दिले की, ग्रामपंचायतीला रुपये ३.०० लक्ष ते १५.०० लक्ष

पर्यंतची कामे जिल्हा परिषद स्तरावरुन करण्यासाठी देण्यांत येतात सदर कामाची ग्रामपंचायत आपल्या स्तरावर पुन्हा ई-निविदा कशी करते याबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. तसेच चालु वर्षात किती ग्रामपंचायतीला कामे वाटप करण्यांत आलेली आहे याची छायांकित प्रत पुरविण्याची मागणी केली. यावर मा.सभाध्यक्ष महोदया यांनी श्री. वैरागकर कार्यकारी अभियंता (सा.बा.) यांना सन्मा.सदस्यांनी मागणी केल्यानुसार सर्व माहिती सभा संपल्यावर किंवा दुसऱ्या दिवशी उपलब्ध करुन देण्याचे निर्देशित केले.

सन्मा. सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले की, आरोग्य विभागा मार्फत औषधी खरेदी हॉपकीन कडूनच खरेदी करण्यांत येते. सद्यास्थितीत गोंदिया जिल्हयातील बऱ्याच प्राथमिक आरोग्य केंन्द्रात औषधीचा तुटवडा दिसुन येत आहे. विद्यमान न्यायालयाने सन २००६ ला पारित केल्यानुसार खरेदची कार्यवाही स्थानिक स्थरावर करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. मागील सभेत हॉपकीन कडून औषधी खरेदी संदर्भात पाच सदस्यीय समिती स्थापन करण्यांत आलेली होती व समितीने संपूर्ण शासन निर्णय व परिपत्रक याचे अवलोकन करुन अहवाल सादर करण्याचे ठरविण्यांत आले होते. परंतू याबाबत आजच्या सभेत विभागाच्या वतिने कोणतीही माहिती ठेवण्यांत आलेली नाही करीता याबाबत वस्तुस्थिती ठेवण्याची मागणी केली. यावर मा. सभाध्यक्ष महोदया यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी यांना ठरल्याप्रमाणे समिती सभेचे आयोजन करुन अहवाल सभेत सादर करण्याचे सुचित केले.

सन्मा. सदस्य श्री. गंगाधर परशुरामकर यांनी जिल्हयात " स्क्रब टायफस" नावाचा आजार फोफावत असल्याचे अवगत करुन त्या आजारावर आरोग्य अधिकारी यांचे कोणतेही लक्ष नसल्याचे आरोप करीत तालुका अर्जूनी मोरगांव येथील मौजा केशोरी व जिल्हयात इतरत्र हा आजार पसरत आहे तसेच या आजारामुळे एक रुग्ण मृत्यु पावल्याचे सभेच्या निदर्शनास आणून दिले. जिल्हा आरोग्य अधिकारी यावर काहीही आवश्यक वेळीच कार्यवाही करत नसुन त्यांचेवर योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली. तसेच सदर आजारा बाबत संपूर्ण जिल्हयात जनजागृती करण्यांत यावी व संपूर्ण संशयीत रुग्णाचे रक्त नमुणे घेण्यात यावे असे मत व्यक्त केले.

सन्मा. सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी आरोग्य विभागा मार्फत जिल्हयात तातडीने सेवा देण्याबाबत सन्मा.अध्यक्ष महोदया यांना विनंती केली.

सन्मा.सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी हॉपकींन मधून आवश्यक औषधी खरेदी करणे बंधनकारक नसल्याबाबत माहिती दिली. सन्मा.सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी आवश्यक औषधी साठा हे जिल्हा निधीतून ,डि.पी.सी. च्या तरतुदी मधून करण्यांत यावी तसेच राज्यशासनाच्या निधीची औषधी ही हॉपकीन कडून खरेदी करणे बंधनकारक असुन जिल्हानिधीतून औषधी ही बाहेरुन खरेदी करता येत असल्याबाबत सभागृहात माहिती दिली. सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी औषधी खरेदी करीता जिल्हास्तरावर तयार करण्यांन आलेल्या पाच सदस्यीय समिती मध्ये एकही महेला सदस्याचा समावेश नसल्यामुळे त्रिव नाराजगी व्यक्त

केली. मा.सभाध्यक्ष महोदया यांनी " स्क्रब टायफस" आजाराबाबत सन्मा.सदस्यांनी विचारणा करण्यांत आलेल्या माहितीचे उत्तर देत जिल्हयात " स्क्रब टायफस" हया आजाराबाबत आरोग्य विभाग हे सर्वतोपरी कार्य करीत असुन सदर आजाराबाबत आरोग्य विभाग जनतेमधे जनजागृती करण्याचे कामे करीत असल्याचे व जिल्हयात सद्या आढळलेल्या रुग्णबाबतची माहिती दिली. जिल्हयात वैद्यकिय अधिकारी यांची संख्या कमी असल्याचे मान्य करीत सदर परिस्थिती आटोक्यात असल्याची माहिती दिली. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी " स्क्रब टायफस" आजाराबाबत सभागृहात माहिती देत जिल्हयात सध्या आढळलेल्या रुग्णबाबत माहिती दिली. यात अर्जूनीमोरगांव तालुक्यात एकुण ४ रुग्ण, सडकअर्जूनी तालुक्यात ३ रुग्ण, गोंदिया तालुक्यात २ रुग्ण आढळून आले असल्याबाबत माहिती देत सदर आजारावर नियंत्रण ठेवण्याकरीता जिल्हयातील सर्व वैद्यकिय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंन्द्र सर्व, एएनएम,आशा स्वयंसेविका व आरोग्य विभागात तालुका, प्रा.आ.केंन्द्र व ग्रामस्तरावर कार्यरत सर्व कर्मचारी यांची सभा घेवून आजाराबाबत जनजागृती व काळजी घेण्याबाबत सुचना निर्गमित करण्यांत आलेले असल्याचे सभेचे निदर्शनास आणून दिले. सदर आजाराची लागवन होवू नये याकरीता जनतेला शेतात काम करतांना पुर्ण कपडे घालण्याकरीता माहिती देण्यास्तव आदेशीत केले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयात अलायझा तपासणी करण्याची व्यवस्था करण्यांत येईल जर शासकिय रुग्णालयात सदर व्यवस्था झाली नाही तर सदर तपासणी ही खाजगी रुग्णालयात करण्यांत येवून सदर तपासणीचा खर्च आपण पुर्ण करणार अशी माहिती सभागृहात देण्यांत आली आहे.

सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी जिल्हा वार्षिक योजनेच्या मागील वर्षीच्या मंजुर यादीतून मौजा करटी, शेजगांव व बोरा गावातील रोड यादीतून का वगळण्यांत आले याबाबत विचारणा केली तसेच तयार करण्यांत आलेला पी.सी.आय. ज्या गावातील रोड फारच खराब आहेत अशा गावांतील रोडाचा समावेश का करण्यांत आलेला नाही अशी विचारणा करुन याबाबत न्याय मागण्यात येईल असे मत व्यक्त केले. तसेच मंजुर यादी माझे तालुक्यातील चांगले रस्त्यांना समाविष्ठ करण्यांत आलेले असल्याचे सांगीतले तसेच तिन वर्षापासुन एकही रस्ता बांधकाम मंजुर यादीत समाविष्ठ नसल्याबाबत त्रिव नाराजगी व्यक्त केली.

सन्मा.सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी पी.सी.आय.मध्ये सुधारणा करण्याची आवश्यक्ता असल्याबाबत माहिती देत कोणते रस्ते जास्त लोक हिताचे आहे हे बघणे व लोक हिता करीता प्राधान्य क्रमाणे पुर्ण करण्यांत यावे तसेच मौजा नवेगांवबांध येथील सभेत निश्चित करण्यांत आलेल्या गावाच्या नावांचे काय झाले याबाबत विचारणा केली. सन्मा.सदस्य श्री. पी.जी.कटरे यांनी सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांचेद्वारे प्रस्तावित करण्यांत आलेल्या रस्ता बांधकाम प्राधान्य क्रमांने घेण्याबाबत मा.अध्यक्ष महोदया यांना विनंती केली. यावर मा.सभाध्यक्ष महोदया यांनी सन्मा.सदस्यांनी सुचिविलेली कामे प्राधान्याने समाविष्ठ करण्याचे आश्वासित केले.

सन्मा.सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी मागील तीन वर्षापासुन जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत लेखाशिर्षक ३०५४ व ५०५४ मध्ये समाविष्ठ रस्त्याची व्यथा मांडून रस्ता बांधकाम मंजुर का करण्यांत येत नाही याबाबत विचारणा केली.. रुपये ३४.३६ लक्ष निधीतून तिसरा रस्ता तयार करण्यांत यावे अशी मागणी केली. यावर मा.सभाध्यक्ष महोदया यांनी सदर रस्ता प्रामुख्याने घेण्यात येईल असे आश्वासित केले. तसेच सन्मा.उपाध्यक्ष महोदय यांनी रामपुर, सेजगांव रस्त्याला प्राधान्य क्रमाने घेण्यांत येईल असे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्य श्री.गंगाधर परशुरामकर यांनी सभेच्या निदर्शनास आणून दिले की, तिरोडा येथील एका भगीनीने तक्रार केली होती त्यानुसार त्या शिक्षकांवर ३५४(१) व ५०६ कलमान्वये गुन्हा दाखल झालेला आहे यावर कोणती कार्यवाही करण्यांत आली अशी विचारणा केली. मा.सभाध्यक्ष महोदया यांनी शिक्षण विभाग विज चोरी करणा-या शिक्षकाला निलंबित करण्यांत येते व विनयभंग करणा-या शिक्षकावर कोणतीही कार्यवाही केली जात नाही याबाबत विचारणा करुन संबंधिताचे वेतनश्रेणी कपात करण्याचे व हलगर्जी करणा-या कर्मचारी यांच्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करण्याचे आदेशित केले.

सन्मा.सदस्य श्री. परशुरामकर यांनी सभागृहात जातपडताळणी प्रकरणी वकीलाला रुपये एक लक्ष दिल्याबाबत अनुपालनात जे उत्तर आले आहे ते योग्य नाही. लांबट असो.यांनी प्रकरण दाखल केले असुन ॲड. परिहार यांना रुपये एकलक्ष निधी का देण्यांत आली तसेच ॲड. परिहार हे सुप्रिम कोर्टाचे प्रकरण लढत नाही असे सभेच्या निदर्शनास आणून दिले.

सन्मा.सदस्या श्रीमती राजलक्ष्मी तुरकर यांनी एक ते सहा वयोगटातील मुलाकरीता व किशोरवयीन मुलांना आहार पुरविणा-या बचत गटांना माहे नोव्हेंबर २०१७ पासुनचा निधी पुरविण्यांत आलेला आहे काय याबाबत सभागृहात माहिती विचारण्यांत आली. यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी महिला व बालकल्याण यांनी सदर निधीच्या बाबत मागणी शासनास करण्यांत आली असल्याची माहिती दिली.

सन्मा.सदस्य श्री.सुरेश हर्षे यांनी सभेत घेण्यात आलेला निर्णय शासनास पाठविण्यांत येत नसल्याचे सभेच्या निदर्शनास आणून दिले. यावर मा.सभाध्यक्ष महोदया यांनी यानंतर सभेत पारीत ठराव माझ्याकडून शासनाला पाठविण्यांत यावे तसेच पुढील सभेत संबंधित विभागाने आप आपल्या विभागाशी संबंधित सभेचे ईतिवृत्त लिहावे असे आदेशित केले.

सन्मा.सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी राजा टायर्स कडे परवाना नसतांना संपूण जिल्हयात ग्रामपंचायत मध्ये टेंडर भरत आहे. सदर प्रकरणाची शहानिश: करण्याची मागणी केली. राजा टायर्स ने जे बिल दिले आहे ते GST चे आहे काय याची चौकशी होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

सन्मा.सदस्या श्रीमती रचनाताई गहाणे यांनी कनिष्ठ महाविद्यालय नवेगावबांध येथे मानधनावर कार्यरत शिक्षकांना अद्याप मानधन का देण्यांत आले नसल्याने शिक्षण विभागाकडून निधी वितरीत करण्यांत

आलेली आहे काय अशी विचारणा केली. संबंधित विभाग प्रमुख यांनी मानधना करीता निधी वितरीत करण्यांत आले असल्याचे सांगीतले. यावर मा.सभाध्यक्ष महोदया यांनी संबंधित मानधनवर कार्यरत शिक्षकांना मानधन अदा करण्यांत आलेला आहे किवा नाही याबाबत शहानिश: करुन माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश केले.

सन्मा.सदस्य श्री. सुरेश हर्षे यांनी MREGS अंतर्गत कंत्राटी कर्मचा-यांना अद्यापही आदेश दिले नसल्याचे अवगत केले तसेच गुरांचा गटविमा करण्याबाबत व गटविमा करण्याकरीता एकुण किती खर्च झाला व किती विमा करण्यांत आला याबाबतची माहिती पुढील सभेत ठेवण्याची मागणी केली.

सन्मा.सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी उमेद कार्यक्रमांतर्गत अर्जूनी मोरगांव येथील सात लेखापाल यांना मागील सात महिण्यापासुन मानधन अदा करण्यासंत आले नसल्याचे सभेच्या निदर्शनास आणून दिले. तसेच समाजकल्याण विभागामार्फत चालविण्यांत येत असलेल्या वृध्द कलाकारांना सभेकरीता प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अदा करण्यात येत नसल्याबाबत सभेच्या निदर्शनास आणून दिले. यावर समाजकल्याण अधिकारी यांनी वर्षे २०१५-१६, २०१६-१७, व २०१७-१८ मध्ये प्रत्येक वर्षी ६० वृध्द कलाकारांना प्रत्यक्ष प्रवास खर्च व दैनिक भत्ता अदा करण्यात येत असुन अतिरिक्त कलाकारांकरीता निधीची मागणी शासनास करण्यांत आलेली आहे अशी माहिती दिली.

सन्मा.सदस्या श्रीमती रजनी कुमरे यांनी महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये मंजुर करण्यांत आलेल्या शिलाई मशीनची रक्कम अजूनही लाभार्थ्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच यावर सन्मा.सदस्या श्रीमती रचना गहाणे यांनी आम्ही निवडलेले लाभार्थ्यांचे नांव यादीतून का वगळण्यात आले अशी विचारणा केली. यावर सन्मा.सभापती महिला व बालकल्याण समिती यांनी सन्मा.सदस्यांनी प्रस्तावित केलेली नांवे सुरु वित्तीय वर्षाच्या यादीत समाविष्ठ करण्याचे आश्वासन दिले.

**<u>विषय क्रमांक २</u> :-** शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.

**ठराव क्रमांक २ :-** सभागृहात परिपत्रकाचे वाचन करण्यात आले नाही.

**विषय क्रमांक ३ :-** मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

**विषय क्रमांक ३/१ :-** श्री एस.के. शेगांवकर, का.अ. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. गोंदिया यांची दिनांक ११.९.२०१७ ते दि. २८.२.२०१८ पर्यंतची १७१ दिवसांची परावर्तीत रजा वैद्यकीय कारणास्तव मंजूर करण्याबाबत.

**ठराव क्रमांक ३/१ :-** सदर विषयावर चर्चा करुन श्री एस.के. शेगांवकर, का.अ. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. गोंदिया यांची दिनांक ११.९.२०१७ ते दि. २८.२.२०१८ पर्यंतची १७१ दिवसांची परावर्तीत रजा वैद्यकीय कारणास्तव मंजूर करण्यास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३/२ :-** सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये (ग्रामीण रस्त्याच्या विकास व मजबुतीकरण ३०५४ २३०१) जि.वा.यो. व (इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण ५०५४) जि.वा.यो. या लेखाशिर्षाअंतर्गत मंजूर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**ठराव क्रमांक ३/२ :-** सदर विषयावर साधक-बाधक चर्चा करुन सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये (ग्रामीण रस्त्याच्या विकास व मजबुतीकरण ३०५४ २३०१) जि.वा.यो. व (इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण ५०५४) जि.वा.यो. या लेखाशिर्षाअंतर्गत मंजूर कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**विषय क्रमांक ३/३ :-** सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात आदिवासी क्षेत्राबाहेरील योजना अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनासाठी स्वतंत्र निधी प्राप्त होणेबाबत.

**ठराव क्रमांक ३/३ :-** गोंदिया जिल्हयात आदिवासी क्षेत्र उपयोजना (OTSP) अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून १५ टक्के आदिवासी क्षेत्राबाहेरील (OTSP) मधील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यासाठी अत्यल्प होत असल्याने अनुसूचीत जमातीचे लाभार्थी लाभापासून वंचित राहतात.

पशुसंवर्धन विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तीक लाभाच्या योजनापासून जिल्हयातील अनुसूचीत जमातीच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध होऊन त्यांना आपले उदरनिर्वाह करुन आर्थिक अडचणीवर मात करण्यात मदत होते. त्यामूळे आदिवासी क्षेत्राबाहेरील योजना (OTSP) अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनांसाठी **स्वतंत्र निधी** उपलब्ध करुन देण्यात यावा असे आजच्या जिल्हा परिषद स्थायी समिती सभेत सर्वानुमते ठराव पारित करण्यात आला.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रमांक ४ :-** स्थायी समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करणे.

**ठराव क्रमांक ४ :-** स्थायी समिती सभेचे ठराव नियम १११ (१३) नुसार कायम करण्यात आले.

| | |
|---|---|
| **सचिव** | Smadavi |
| स्थायी समिती सभा तथा | **सभापती** |
| उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.) | स्थायी समिती तथा अध्यक्ष |
| जिल्हा परिषद, गोंदिया | जिल्हा परिषद, गोंदिया |

## जिल्हा परिषद स्थायी समिती सभा दिनांक १८ सप्टेंबर २०१८

## कार्यवृत्त भाग २

| दिनांक व वेळ | उपस्थित पदाधिकारी व अधिकाऱ्यांची नांवे | कार्यवृत्त |
|---|---|---|
| दिनांक १८.९.२०१८<br>वेळ दुपारी १.०० वा. | हजेरी पटाप्रमाणे | पुढीलप्रमाणे |

**विषय क्रमांक १ :-** मागील सभेच्या कार्यवृत्तास मंजूरी प्रदान करण्याबाबत.

**ठराव क्रमांक १ :-** दिनांक २१.८.२०१८ ला झालेल्या सभेच्या कार्यवृत्तावर चर्चा करुन कार्यवृत्त सर्वानूमते मंजूर करण्यात आले.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक २ :-** शासकीय परिपत्रकाचे वाचन करणे.

**ठराव क्रमांक २ :-** सभागृहात परिपत्रकाचे वाचन करण्यात आले नाही.

**विषय क्रमांक ३ :-** मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.

**विषय क्रमांक ३/१ :-** श्री एस.के. शेगांवकर, का.अ. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. गोंदिया यांची दिनांक ११.९.२०१७ ते दि. २८.२.२०१८ पर्यंतची १७१ दिवसांची परावर्तीत रजा वैद्यकीय कारणास्तव मंजूर करण्याबाबत.

**ठराव क्रमांक ३/१ :-** श्री एस.के. शेगांवकर, का.अ. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. गोंदिया यांची दिनांक ११.९.२०१७ ते दि. १३.२.२०१८ पर्यंतची १५६ दिवसांची अर्जित रजा व दिनांक १४.०२.२०१८ ते २८.०२.२०१८ पर्यंत १५ दिवसाच्या परावर्तीत रजेवर होते. त्यांनी उपरोक्त कालावधीची रजा उपभोगून कार्यक्षम असल्याचे शासकीय वैद्यकिय मंडळाचे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केले आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधिल नियम-१०९ (३) ड नुसार श्री एस.के. शेगावकर, का.अ. ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जि.प. गोंदिया यांची उपरोक्त कालावधीची रजा मंजूर करण्यास स्थायी समितीची आजची सभा सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात करीत आहे.

**ठराव सर्वानुमते मंजूर.**

**विषय क्रमांक ३/२ :-** सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये (ग्रामीण रस्त्याच्या विकास व मजबुतीकरण ३०५४ २३०१) जि.वा.यो. व (इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण ५०५४) जि.वा.यो. या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

**ठराव क्रमांक ३/२ :-** सदर विषयावर साधक-बाधक चर्चा करुन सन २०१७-१८ या आर्थिक वर्षामध्ये (ग्रामीण रस्त्याच्या विकास व मजबुतीकरण ३०५४ २३०१) जि.वा.यो. व (इतर जिल्हा रस्ते विकास व मजबुतीकरण ५०५४) जि.वा.यो. या लेखाशिर्षा अंतर्गत मंजूर कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय क्रमांक ३/३ :-** सन २०१८-१९ या वित्तीय वर्षात आदिवासी क्षेत्राबाहेरील योजना अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनासाठी स्वतंत्र निधी प्राप्त होणेबाबत.

**ठराव क्रमांक ३/३ :-** गोंदिया जिल्हयात आदिवासी क्षेत्र उपयोजना (OTSP) अंतर्गत प्राप्त होणाऱ्या निधीतून १५ टक्के आदिवासी क्षेत्राबाहेरील (OTSP) मधील वैयक्तीक लाभाच्या योजना राबविण्यासाठी अत्यल्प होत असल्याने अनुसूचीत जमातीचे लाभार्थी लाभापासून वंचित राहतात.

पशुसंवर्धन विभागा मार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तीक लाभाच्या योजनापासून जिल्हयातील अनुसूचीत जमातीच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगार उपलब्ध होऊन त्यांना आपले उदरनिर्वाह करुन आर्थिक अडचणीवर मात करण्यात मदत होते. त्यामूळे आदिवासी क्षेत्राबाहेरील योजना (OTSP) अंतर्गत वैयक्तीक लाभाच्या योजनांसाठी **स्वतंत्र निधी** उपलब्ध करुन देण्यात यावा असे आजच्या जिल्हा परिषद स्थायी समिती सभेत सर्वानुमते ठराव पारित करण्यात आला.

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सचिव**
स्थायी समिती सचिव तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, गोंदिया

Smadavi
**सभापती**
स्थायी समिती तथा अध्यक्ष
जिल्हा परिषद, गोंदिया